N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस ठाणे दौलताबाद छत्रपती संभाजीनगर (शहर)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद शहर  **P.S.(ठाणे):** दौलताबाद
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0039  **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/02/2024 22:08

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
**1. Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 22/02/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2024
**Time From (वेळेपासून):** 13:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:45 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/02/2024  **Time (वेळ):** 21:36 बजे
**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2024 21:36 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**
**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 10 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
**(b) Address (पत्ता):** ग्राम संसद कार्यालय , शिंदी सिरजगाव ता गंगापुर ,जि छत्रपती संभाजीनगर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भारत माणिकराव नरोडे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 1486,टी पाँईट,देवगाव रंगारी,जि छत्रपती संभाजीनगर,दौलताबाद, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माळीवाडगाव ता गंगापूर,जि छत्रपती संभाजीनगर,दौलताबाद,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9403690798

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद भाऊराव साळवे | | | 1. तलाठी सजा शिंदी सिरजगाव , ता गंगापुर,जि छत्रपती संभाजीनगर,दौलताबाद, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी भारत माणिकराव नरोडे वय-56 वर्षे धंदा- शेती रा- माळीवाडगाव ता-गंगापूर जि-छ.संभाजीनगर ह.मु.1486,टी पॉईट,देवगाव रंगारी, जि.छ.संभाजीनगर ,मो.नं.9403690798
समक्ष पोलीस ठाणे दौलताबाद छ.संभाजीनगर येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 25/01/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छ.संभाजीनगर येथे लोकसवेक यांचे विरुध्द लाचमागणीची तक्रार सांगितली.त्यानंतर पोलीसांनी शासकीय पंचांना पत्र देवुन पंच मागणी केली परंतु मला गावी तात्काळ जाणे असल्याने पंच येईपर्यत थांबणे शक्य नसल्याने मी लेखी तक्रार दिली ती पोलीसांनी बंद लिफाप्यात सिल केली ती पुढीलप्रमाणे,
.मी शेती व्यवसाय करतो त्यावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.माझी माळीवडगाव,ता.गंगापुर येथे गट नं 62येथे साधारणसाडेतीन एकर जमीन आहे. सदर शेतजमीनीच्या शेतविकासासाठी विहीर खोदणी,तारकंपाउंड, पाईप लाइन करणे इ.कामासाठी मी आरबीएल बँकेकडे कर्जाचा प्रस्ताव दिला आहे.त्यांनी जमीन तारण ठेवुन 12,74,855रू. च्या कर्जास मंजुरी दिली आहे. बँकेने माझा कर्ज प्रस्ताव मंजुर करण्या करिता तलाठी सजा माळीवडगाव यांना दिलेल्या बोजापत्रावर तलाठी यांची सही व शिक्का आवश्यक असल्याचे कळवुन ते पत्र माझ्याकडे दिले. दि.25-01-2024 रोजी मी ,तलाठी यांची सजा माळीवाडगाव यांची भेट घेवुन सही शिक्क्याची मागणी केली असता त्यांनी पत्रावर सही केली परंतु शिक्का दिला नाही. शिक्का मारण्याची मी त्यांना विनंती केली असता त्यांनी शिक्का मारण्यासाठी व 7/12 उताऱ्यावर बोजा नोंदविण्या करिता नमुना -9 ची नोटीस काढण्यासाठी 5000रु.ची मागणी केली आहे.उद्या शिंदी शिरसगाव सजा येथे पैसे घेवुन आले तरच शिक्का मिळेन असे सांगितले आहे.मी उद्या दिनांक 26-01-2024 रोजी सजा शिंदीशिरसगाव येथे तलाठी यांची भेट घेणार आहे.त्यांचेकडे माळी वाडगाव सजा चा ही चार्ज आहे.माझी तलाठी श्री साळवे यांना लाच देण्याची इच्छा नाही त्यांचेशी माझा काहीएक देण्या घेण्याचा उसनवारीचा व्यवहार नाही.त्याचेशी माझे कोणतेही वैर अगर दुश्मनी नाही लाच मागणी करुन घेतल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे लेखी तक्रार देवुन मी गावी परत आलो
दि.26/01/2024 रोजी पोलीस पंचा सह ठरलेल्या ठिकाणी स.07.30 वा.आलो मी सुध्दा त्या ठिकाणी माझ्या मोटार सायकलने पोहचलो तेथे पोलीस उपअधिक्षक श्री दिलीप साबळे यांनी माझी पंचांशी ओळख करुन दिली व मी दिलेली सिलबंद लिफाफ्यातील तक्रार पंचांना वाचण्यास दिली.पंचांनी तक्रार वाचुन तक्रारीवर सही केली तसेच समक्ष म्हणुन पो.उप अधि.श्री साबळे साहेबांनी सही केली मला व पंचास तसेच पथकातील सदस्यांना आवश्यक सुचना दिल्या. तलाठी साळवे यांनी पैसे घेवुन आल्यावर बोजापत्रावर शिक्का देणार असल्याचे बजावुन सांगितले असल्याने पो.उप अधि श्री साबळे यांनी माझेशी व पंचांशी चर्चा केली त्यावेळी झालेल्या चर्चेअंती तलाठी साळवे यांनी मागणी केलेल्या लाचमागणी रक्कमे पैकी 1,000 रु.मला खिशात ठेवण्यास सांगितले.त्यानंतर मी ,तलाठी श्री साळवे यांची भेट घेण्यासाठी रवाना होण्या पुर्वी श्री साबळे यांचे सुचने प्रमाणे पो.हवा जिवडे यांनी मला व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला त्यानंतर मी व पंच श्री गजहंस असे तलाठी यांना भेटण्यासाठी शिंदी शिरसगाव सजा येथे माझे मोटार सायकल वर रवाना झालो.
मी शिंदी शिरसगाव येथील सजा कार्यालयात गेलो असता तेथे तलाठी साहेबांची प्रजासत्ताक दिनानिमीत्त असलेल्या झेंडा वंदन कार्यक्रमा नंतर भेट झाली त्यावेळी मी त्यांना म्हणालो काल तुम्ही शिक्के दिले असते तर माझे बँकेचे काम झाले असते " तुम्ही सांगितलेले 5000 रु.जास्त होते आहेत तेव्हा ते म्हणाले की,अहो 5000 रु.नाही मी 2000 रु.सांगितले आहेत तुमचा काही तरी गैर समज झाला आहे तेव्हा मी ठरल्याप्रमाणे 1000 रु.ची रक्कम श्री साळवे दिली तेव्हा त्यांनी माझे बँकेच्या पत्रावर शिक्का मारुन दिला.व उर्वरीत रक्कम नियम क्र.9 ची नोटीस दिल्यावर देतो असे सांगितले होते.
त्यानंतर तलाठी श्री साळवे यांनी आम्हास चहा घेण्यासाठी आसेगाव येथील फाटयावर चहाचे हॉटेल वर नेले तेथे गेल्यावर मी,पंच व तलाठी साहेब असे आम्ही तिघे एका टेबलवर बसलो.तेथे आम्ही चहा घेतली तसेच मी तलाठी श्री साळवे यांना 9 ची नोटीस कधी मिळेल अशी त्यांना विचारणा केली असता आज सायबर कॅफे मधील मुलगा

असेल तर मी संभाजीनगरला गेल्यावर तुमच्या व्हॉटस्अप वर पाठवितो असे सांगितले मी त्यांना बँकेच्या कामासाठी संभाजीनगरला येणार आहे तेथे आल्यावर भेटतो असे कळविले त्यास तलाठी यांनी संमती दिली
त्यानंतर मी व पंच असे सापळा कारवाईचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो .त्यानंतर सापळा पथकातील श्री जिवडे यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर बंद केला.त्यानंतर श्रीसाबळे व पंच यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्डींग ऐकली त्यामध्ये तलाठी यांनी बोजापत्रावर शिक्का मारुन देण्यासाठी व नियम 9 ची नोटीस देवुन 7/12 उताऱ्यावर बोजा चढवुन देण्यासाठी 2000 रु.ची मागणी केल्याचे निष्पन्न झाले त्यापैकी ठरल्या प्रमाणे मी त्यांना 1000 रु. दिले होते उर्वरीत 1000 रु.संभाजीनगर येथे जावुन देण्याचे ठरले त्या प्रमाणे मी ,पोलीसांसोबत संभाजीनगर येथे आलो तेथे आल्या नंतर तलाठी यांना फोन करुन 9 ची नोटीस घेण्यासाठी व पैसे देण्यासाठी भेटण्याचे ठिकाण विचारण्याचे पो.उप अधि श्री साबळे,मी व पंच यांचेतील चर्चेअंती ठरले
त्यानंतर श्री दिलीप साबळे यांनी सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली व तलाठी श्री साळवे यांनी लाच स्वीकारल्या नंतरचा डोक्याची लोकरीची माकड टोपी काढुन नियोजीत ईशारा करण्यांस सांगीतले. तसेच ॲनथ्रासीन पावडर चे गुणधर्म मला व पंचाना समजावुन सांगीतले व त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखविण्यात आले व मी आणलेल्या 500 रु.च्या 2 अशा 1000रु.च्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुनती 1000 रु.लाचेची रक्कम रुपये माझे पॅन्टीचे उजव्या बाजुचे पॅन्टच्या खिशात ठेवली व उर्वरीत सामाना रुमाल,चावी पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आले.
त्याप्रमाणे मी,तलाठी यांना दोन वेळा फोन केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर मी संभाजीनगर येथे आलो असल्याचा त्यांना मेसेज केला परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही बराच वेळ वाट पाहिल्यानंतर पंच,पोउपअधि श्री साबळे व माझेत झालेल्या चर्चेत सापळा कारवाई स्थगीत करण्याचे ठरले माझे कडे असलेले पावडर लावलेले 1000 रु.पंचासमक्ष पोउपअधि श्री साबळे यांनी जमा करुन घेतले.तसेच तलाठी यांचा फोन आल्यास तात्काळ पोउपअधि श्री साबळे यांना कळविण्याचे ठरले व त्यानंतर पुढील कारवाईची दिशा ठरविण्याचे नियोजन केले.
त्यानंतर मी माझे वाहनाने गावी आलो. दि. 26/01/2024 रोजी दुपारी 04.00 वा.च्या सुमारास त्यांचा फोन आला व कॉम्प्युटर सेंटर मधील मुलगा आला नसल्याने 9 ची नोटीस काढता आली नाही सोमवारी पाहु असे सांगितले
त्यानंतर दि.31/01/2024 रोजी मी तलाठी साळवे यांना सकाळी 11.00वा.चे सुमारास फोन केला असता त्यांनी मला संभाजीनगर येथे भेटण्यास बोलाविले. संभाजीनगरला पोहचल्यावर मी,पोउपअधि साबळे व स्टाफला भेटलो त्यांचे सांगणे प्रमाणे तलाठी यांना भेटीचे स्थान विचारण्या करिता फोन केला असता त्यांनी ते कामानिमीत्त लासुर ला आल्याचे सांगितले तसेच तुमचे संभाजीनगर येथील बँकेचे काम झाल्यावर फोन करण्यास कळविले त्याप्रमाणे मी पंच व पोलीस पथकासमक्ष दुपारी 04.30वा.चे सुमारास त्यांना फोन केला असता त्यांनी मला जिल्हाधिकारी कार्यालय संभाजीनगर येथील सभागृहात भेटण्यास बोलाविले. पोहवा/ जिवडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझेकडे दिला मी व पंच श्री गजहंस असे माझे मोटारसायकलवरुन व पोउपअधि श्री साबळे व पोहवा/जिवडे हे त्यांचे मोटारसायकलवरुन जिल्हाधिकारी कार्यालय गेलो परंतु सभागृहात झालेल्या भेटीच्या वेळेस त्याने नमुना 9 च्या नोटीशीवर सही केली परंतु शिक्का गाडीत ठेवला असुन कार्यक्रम संपल्यावर दोन ते अडीच तासानंतर मी शिक्का मारुन देतो तुम्ही गाडीजवळ थांबा असे सांगितले त्यावेळी त्यांनी पैशाबाबत काहीएक विचारणा केली नाही तेव्हा मी व पंच श्री गजहंस परत सापळा पथकाकडे आलो. व्हाईस रेकॉर्डर व लाचेची रक्कम पंचासमक्ष पथकाचे ताब्यात दिली. संभाषण ऐकल्यानंतर व तलाठी यांचे वर्तनावरुन सदर नोटीशीतील आक्षेप कालावधी 15 दिवस संपल्यानंतर अथवा त्या दरम्यान तलाठी यांनी फोन करुन बोलाविले तर सापळा कारवाई आजमाविण्याचे पंचासमक्ष आम्ही ठरविले.
दि.13/02/2024 रोजी आक्षेप कालावधी संपला परतु तलाठी यांनी माझे सात बाऱ्यावर बोजाची नोंद चढविली नाही तेव्हा पोउपअधि श्री साबळे यांना त्याबाबत माहिती दिली त्यांनी मला तलाठी यांचे शिंदीशिरसगाव अथवा माळी वाडगाव येथील सजावर येण्याचा कार्यक्रमाची माहिती देण्यास सांगितली मी त्याबाबत माहिती घेतली असता तलाठी दि.20/02/2024 रोजी शिंदी शिरसगाव येथील सजावर येणार असल्याचे समजले त्याप्रमाणे पोउपअधि साबळे हे पंच व त्यांचे स्टाफसह शिंदी शिरसगाव येथे आले त्यांनी मला व्हाईस रेकॉर्डर देवुन पंचासह तलाठी श्री साळवे यांचे भेटीसाठी पाठविले परंतु ते सजावरुन लवकर निघुन गेल्याने त्यांची भेट झाली नाही.
त्यांनतर दि.21/02/2024 रोजी सुध्दा पोलीस पथक शिंदी शिरसगाव येथे आले पोउपअधि श्री साबळे यांचे सुचनेवरुन मला तलाठी श्री साळवे हे सजावर आल्याची माहिती घेतली असता ते शिंदी शिरसगाव येथे आले नसल्याचे समजले.तेव्हा पोलीस पथक परत निघुन गेले.
आज दि.22/02/2024 रोजी मी शिंदीशिरसगाव येथील नातेवाईकास फोन करुन माहिती घेतली असता तलाठी

श्री साळवे हे सजावर आले असल्याचे समजले तेव्हा मी तात्काळ पोउपअधि श्री साबळे साहेबांना फोन करुन कळविले.ते त्यांचे सापळा पथक व दोन शासकीय पंचासह शासकीय वाहनाने ठरलेल्या ठिकाणी पोहचले
सापळा कारवाई करणे असल्याने पोउप अधि श्री साबळे साहेब यांनी मला, पंचास व त्यांचे स्टाफ ला योग्य त्या सुचना दिल्या त्यांच्या सुचने वरुन पोहवा जिवडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या कडे दिला मी व पंच क्रमांक 1 श्री गजहंस दुपारी 13.33 वा.मोटारसायकलने तलाठी सजा कार्यालया कडे रवाना झालो आमचे पाठोपाठ पोलीस उपअधिक्षक श्री दिलीप साबळे व पोहवा/ जिवडे असे पायी चालत आले ,पथकातील इतर अंमलदार व पंच क्र.2 श्री शिंदे यांना सरकारी वाहनासह गावाबाहेर थांबण्यास सांगितले तेथे तलाठी सजा असलेल्या ग्रामसंसद कार्यालय समोर आलो असता तलाठी श्री साळवे हे कार्यालयाचे बाहेर पायरीवर बसले होते मी माझी मो.सा.बाजुस लावुन जवळ जावुन नमस्कार केला त्यांना मी बोजा सात बाऱ्याला दिसला नाही अशी विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगतो त्यांना ते आपल बाकी होत नां .असे म्हणाले असता मिळुन जाईल असे सांगितले. एक राहिले होते हे घेवुन टाका असे म्हणुन लाचमागणीचे राहिलेले उर्वरीत 1000 रु. त्यांना दिली ती रक्कम माझेकडुन तलाठी यांनी रक्कम स्विकारल्यानंतर मी डोक्यास बांधलेला रुमाल काढुन नियोजीत इशारा केला लगेच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी तसेच पंच क्र.2 शिंदे असे सदर घटनास्थळी आले.
त्यानंतर सापळा पथकाने तलाठी श्री साळवे यांना ताब्यात घेतलेल्या नंतर साबळे साहेब यांनी तलाठी यांना त्यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम खिशातुन काढण्यास सांगितले ती त्यांनी पंचा समक्ष स्वत :चे शर्टचे डाव्या बाजुचे खिशातुन स्विकारलेली लाचेची रक्कम 1000/-रुपये स्वत:चे हाताने काढुन आमचे सर्वा समक्ष धरली ती पंच क्र.1 श्री गजहंस यांनी हस्तगत केली पंच क्र.2 श्री शिंदे यांनी नोटांचे क्रमांक व रक्कम पडताळुन पाहिली व सदर नोटा त्याच असल्याचे सांगितले
तलाठी श्री साळवे यांना पोलीस उप अधिक्षक श्री दिलीप साबळे यांनी स्वत:चा परिचय देवुन तलाठी यांना त्यांचे संपुर्ण नाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री विनोद भाऊराव साळवे वय-44वर्षे पद- तलाठी (वर्ग 3) सजा - शिंदी सिरसगाव ता-गंगापुर जि-छ.संभाजीनगर असे सांगितले. पोलीसांनी त्यास ताब्यात घेतले
CCTNS प्रणाली मध्ये 8000 शब्दाची मर्यादा असल्या कराणाने उर्वरीत फिर्याद ही सोबत जोडली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

JANRARDHAN SUBHASH SALUNKE(SI (Sub-Inspector)) / DGPISSM8002 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

कर्तव्य अधिकारी
पोलीस ठाणे दौलताबाद
छत्रपती संभाजीनगर (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): JANRARDHAN SUBH/
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): DGPJSSM8002